चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

११ जुलै, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चिमुर पोलीसांची मोहा हातभट्टीवर कार्यवाही
# २९ लक्ष ९२ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक १०/०७/२०१९ रोजी पोलीस स्टेशन चिमुर येथील पोलीस पथक पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, ताडोबा बफर झोनमधील मानुसमारी जंगल भागात काही इसम हातभट्टी लावुन मोहादारू तयार करीत आहे. अशा माहिती वरून चिमुर येथील पोलीस पथकाने सापळा रचुन जंगल परिसरात छापा टाकला असता, मोठया प्रमाणात मोहा दारूचा साठा आणि मोहा सडवा दिसुन आला. यामध्ये मोहा सडवा १३,५६० किलो. मोहा दारू किं. ६१२ लिटर, हातभट्टी साहीत्य किं. ८,६०० रू, असा एकुण **२६,९२,९००/—रू** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन चिमुर येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक, चंद्रपुर श्री.महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी चिमुर, श्री. मारोती इंगवले, यांचे नेतृत्वात, पोस्टे चिमुर प्रभारी पोनि. श्री. स्वप्नील धुळे यांचे नेतृत्वात पोउपनि. किरण मेश्राम, राजु गायकवाड, पोहवा. विलास निमगडे, पोना. किशोर बोडे, पोशि. सचिन गजभिये, विनायक सुरकुंडे, सुशिल आठवले, सचिन साठे, कैलास आलाम, देविदास रणदिवे, विजय उपरे पार पाडली.

---